# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१२२४/प्र.क्र.१५४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - ०३.०७.२०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.

विषय:- वनजमिन-पुणे
वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता, लघुसिंचन पाटबंधारे (जलसंधारण) विभाग, कळवा, ठाणे यांना आल्याणी लघु पाटबंधारे प्रकल्पाकरीता ठाणे जिल्ह्यातील ३२.३५७ हे. वनक्षेत्र वळतेकरणाबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७ / नोडल / ठाणे / आयडी-२३७७९ / ५५७ / २४-२५, दि.०५.०६.२०२४.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) प्रकल्पामध्ये चौकी बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून, सदर चौकीसाठी वनजमिनीची आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे. परंतु, KML फाईलच्या अवलोकनावरून प्रस्तावित केलेली चौकी वनजमिनीवर असल्याचे दिसून येते, याबाबत खातरजमा करावी.

(२) उपवनसंरक्षक यांच्या पार्ट-२ मध्ये प्रकल्पामध्ये जाणाऱ्या पोहोच रस्त्यासाठी कोणतीही वृक्षतोड होणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र KML फाईलचे अवलोकन केले असता प्रकल्पामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेल्या पोहोच रस्त्यामध्ये बऱ्याच प्रमाणात वृक्ष असल्याचे दिसून येते. याबाबत फेर तपासणी करुन माहिती सादर करावी.

(३) प्रकल्पामध्ये सन २०१५ आणि सन २०१७ साली करण्यात आलेले स्थळपहाणी अहवाल जोडण्यात आले आहेत. मध्यंतरीच्या काळात त्यामध्ये बरेचसे फेरबदल झाले असल्याची शक्यता असल्याने सद्य:स्थितीदर्शक सुधारीत स्थळपहाणी अहवाल विहीत नमून्यामध्ये सादर करावा.

(४) प्रकल्पास तांत्रिक मान्यता मिळाल्याचे दस्तावेज सादर करावेत.

(५) प्रकल्पामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेल्या मौजे कुंदाळी, सर्व्हे क्र.३७, मौजे महज, सर्व्हे क्र.५६ भाग, सर्व्हे क्र.१२, मौजे पऱ्हे, सर्व्हे क्र.३, सर्व्हे क्र.३२, मौजे अल्याणी, सर्व्हे क्र.५, सर्व्हे क्र.५३ चे अधिकार अभिलेख सादर करावेत.

(६) प्रकल्पामध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता मान्य करणे) अधिनियम,२००६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांचे दिनांक ३०.१०.२०२० रोजीचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात वनहक्कांमध्ये काही बदल झाला आहे किंवा कसे, याबाबतची माहिती सादर करावी.

(७) प्रकल्पामध्ये खाजगी वनजमिनीचा समावेश आहे, सबब, सदर खाजगी हक्कधारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त सादर करावे.

(८) प्रस्तावामधील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जसे, उपवनसंरक्षक यांच्या बहुतांश प्रमाणपत्रांवर दिनांक नमूद केलेला नाही, स्थळपाहणी अहवाल सन २०१५ व २०१७ मधील जुन्या नमुन्यामधील आहे व इतर ही अनुषंगिक कागदपत्रे सुमारे ४-५ वर्षापूर्वीची असल्याची दिसून येतात. सबब, सदर प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे दिनांकासहित, सद्यस्थितीदर्शक व विहीत नमुन्यात सादर करावीत.

(९) KML File च्या अवलोकनावरून पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे जागजी येथील सर्व्हे नंबर ३०८ व मौजे निलेगांव येथील सर्व्हे नंबर १७६ येथील क्षेत्रावर यापूर्वीच CCT work आणि वृक्षलागवड केल्याचे दिसून येते. याबाबत फेरतपासणी करुन अहवाल सादर करावा.

(१०) सदरची प्रस्तावित CA ची जमिन यापूर्वी नेवाडे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी दिली होती. सदर प्रकल्प कार्यान्वीत होणार नसल्यामुळे सदर जमिन या प्रकल्पासाठी CA म्हणून प्रस्तावित केली असल्याचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांच्या दिनांक २३.०६.२०१५ च्या पत्रावरुन दिसून येते. सदरचे पत्र जवळजवळ ९ वर्षापेक्षा जास्त कालावधीचे असल्याने सद्य:स्थितीत नेवाडे प्रकल्प कार्यान्वीत झाला किंवा कसे, नसल्यास प्रस्तावित CA म्हणून अन्य प्रकल्पास हस्तांतरीत केली किंवा कसे, यासंदर्भात अद्ययावत माहिती सादर करावी.

(११) मौजे निलेगाव, गट नं.१७६ मधील १२.३६ हे. क्षेत्राची पर्यायी वनीकरणाची १० वर्षाची योजना सादर करावी.

(१२) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे. निलेगाव, गट नं.१७६ मधील ३०.०० हे. क्षेत्र यापूर्वी विष्णुपुरी (खंडकोळी) ता. पालघर योजनेसाठी लागणाऱ्या वनजमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरण क्षेत्र म्हणून वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदर प्रकल्प सद्य:स्थितीत कार्यान्वीत आहे किंवा कसे ? नसल्यास, सदर जमिन अन्य प्रकल्पासाठी CA म्हणून हस्तांतरीत केली आहे किंवा कसे, याबाबत माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे

उपवनसंरक्षक (प्रा.), ठाणे

विभागीय वन अधिकारी, धाराशिव